रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १६ • अंक ३६०
www.ramprahar.com
बुधवार, १७ जुलै २०२४ • पाने ८ • किंमत ₹ २









# रायगडच्या वार्षिक विकास आराखड्यातील सर्व निधी वितरीत -पालकमंत्री उदय सामंत

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय नियोजन समितीने रायगड जिल्ह्याच्या २०२३-२४च्या ४३० कोटी सहा लाख रुपयांच्या वार्षिक विकास आराखड्याला मंजुरी दिली आहे. हा सर्व निधी वितरीत करण्यात आला असून त्यातील २३७ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी खर्च झाला आहे, अशी महिती रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी (दि. १६) पत्रकार परिषदेत दिली.

रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक मंगळवारी अलिबाग येथील नियोजन भवनमध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री सामंत यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत पालकंत्र्यांनी ही माहिती दिली. शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे या वेळी उपस्थित होते.

२०२३-२४ या वर्षाचा रायगड जिल्ह्याचा ३६० कोटी रुपयांचा वार्षिक विकास आराखडा जिल्हा नियोजन समितीने मंजूर केला आहे. राज्यस्तरीय समितीने तो वाढवून ४३० कोटी सहा लाख रुपयांचा केला. या आराखड्यात जिल्हा वार्षिक योजनेसाठी ३६० कोटी रुपये, अनुसूचित जाती उपाययोजनेसाठी २७ कोटी रुपये, तर आदिवासी उपाययोजनेसाठी ४३ कोटी लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा सर्व निधी वितरीत करण्यात आला आहे, अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी या वेळी दिली.

लोकसभेची आचारसंहिता असल्याने जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत खर्चाचे प्रमाण कमी दिसत आहे. उपरोक्त कमी खर्च हा स्थानिक स्वराज्य संस्थांचा असून ३१ मार्च २०२५पर्यंत निधी खर्च करण्याची त्यांना मुदत आहे व हा निधी तोपर्यंत पूर्णपणे खर्च होईल. सन २०२३-२४मध्ये नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ५५ लाख ४६ हजार रुपयांची तीन कामे मंजूर करण्यात आली असून सर्व निधी वितरीत करण्यात आला होता. हा सर्व निधी खर्च झाला आहे, असे पालकमंत्री सामंत यांनी सांगितले.

सन २०२३-२४ मध्ये यंत्रणांच्या मागणीनुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ५२ कोटी २९ लाख रकमेचे पुनर्विनियोजन करण्यात आले. अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत ६४ लाख रुपये रकमेचे पुनर्विनियोजन करण्यात आले तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत सहा कोटी ९७ लाख रूपये रकमेचे पुर्नविनियोजन करण्यात आले. एकूण ५९ कोटी ९० लाख रुपये रकमेचे पुनर्विनियोजन करण्यात आले.

या बैठकीला जे अधिकारी गैरहजर राहिले त्यांना करणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, असेही पालकमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

## जलजीवन योजनेच्या कामांचा आढावा घेणार

रायगड जिल्ह्यातील जलजीवन योजनेच्या कामांचा आढावा येत्या आठ दिवसांमध्ये प्रत्येक आमदार घेणार आहे तसेच केंद्र सरकारच्या योजनांचा आढवादेखील घेतला जाणार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. या योजनेत जो कुणी एजंटगिरी करत असेल त्याच्यावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी या वेळी दिली.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाचा आढावा रायगडचे खासदार सुनील तटकरे येत्या २० जुलै रोजी घेणार आहेत. त्यानंतर मी स्वतःही या माहामार्गाच्या कामाची पाहणी करणार आहे. ईशाळवाडीतील दरडग्रस्तांना येत्या १५ दिवसांमध्ये नवीन घर ताब्यात देण्यात येईल, असे पालकमंत्री सामंत यांनी सांगितले.

जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी १०५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीसाठी ७७ कोटी रुपये, प्रांत कार्यालयासाठी सहा कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. अलिबागमध्ये सुसज्ज व्यायामशाळा उभारण्यात येणार आहे. जिल्हा न्यायालयातील वकिलांच्या हॉलसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्यात सिनारमचा कागदाचा प्रकल्प येणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना एकरी ९५ कोटी रुपयांचा दर निश्चित करण्यात आला आहे, अशी माहिती पालकमंत्र्यांनी दिली.

# शेकापच्या जयंत पाटलांनी ठाकरे गट, काँग्रेसवर फोडले पराभवाचे खापर

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीकडून आधी दोनच उमेदवार देण्याचा निर्णय झाला होता, मात्र शिवसेनेने आयत्यावेळी तिसरा उमेदवार दिला. त्यामुळे आपली अडचण झाली. काँग्रेसनेही त्यांच्याकडे असलेली जास्तीची मते दोन्ही उमेदवारांना विभागातून दिली असती, तर निकालाचे चित्र वेगळे असते, असे सांगत शेकापाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी आपल्या पराभवाचे खापर अप्रत्यक्षरित्या उद्धव ठाकरेंच्या गटावर फोडले आहे.

विधान परीषद निवडणूकीतील पराभवानंतर जयंत पाटील प्रथमच अलिबाग येथे आले. त्यांनी अलिबाग येथील शेतकरी भावन येथे झालेल्या शेकाप कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना विधान परिषदेतील आपल्या पराभवाचे विस्तृत विश्लेषण केले. आपल्या पराभवाचे खापर त्यांनी अप्रत्यक्षरीत्या ठाकरेंच्या शिवसेनेवर फोडले. महाविकास आघाडीकडून दोनच उमेदवार देण्याचा निर्णय झाला होता, मात्र शिवसेनेने आयत्यावेळेस तिसरा उमेदवार दिला. विधान परिषद निवडणूकीसाठी महाविकास आघाडीकडून दोनच उमेदवार देण्याचे ठरले होते, मात्र शिवसेना उबाठा गटाने शेवटच्या क्षणी तिसरा उमेदवार दिला. त्यामुळे आपली अडचण झाली. काँग्रेसनेही त्यांच्याकडे असलेली जास्तीची मते दोन्ही उमेदवारांना विभागातून दिली असती, तर निकाल वेगळा लागला असता, असे जयंत पाटील म्हणाले.

हितेंद्र ठाकूर यांच्या तीन आमदारांच्या सतराशे कोटींची कामे दिली, त्यामुळे शेवटच्या क्षणी त्यांनी मला मते दिली नाहीत. विधान परिषद निवडणूकीत आमदारांची मते २५ कोटींना विकत घेतली गेली, असा गंभीर आरोप जयंत पाटील यांनी केला. ज्यांना जिल्हा मध्यवर्ती बँक असो अथवा इतर माध्यमातून करोडो रुपयांची मदत केली त्यांनी फसवल्याची खंत पाटील यांनी या वेळी व्यक्त केली.



**पनवेल : आषाढी एकादशीनिमित्त तालुक्यातील तारा येथील बानू बैन प्रवीण शहा माध्यमिक विद्यालय आणि जुनिअर कॉलेजच्या वतीने मंगळवारी शाळेमध्ये दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी लेझीम, फुगडी, रिंगण असे अनेक उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थी आणि शिक्षकांनी विठूनामाचा जयघोष करीत गावात दिंडी मिरवणूक काढली. बानू बैन प्रवीण शहा विद्यालयामध्ये पहिल्यांदाच या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीला विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

**रायगड : प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेचा जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आरसीएफ हॉल कुरुळ, अलिबाग येथे मंगळवारी (दि. १६) करण्यात आला तसेच जिल्हा परिषद शेष फंडातील निधीतून महिला बचतगट व दिव्यांगांना ई-शॉप वाहन वितरण करण्यात आले.

या वेळी खासदार सुनील तटकरे, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)रविंद्र शेळके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण निर्मला कुचिक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनित म्हात्रे, आदी उपस्थित होते.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून अर्पिता पाटीलला अर्थसहाय्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वैद्यकीय शिक्षणासाठी पनवेल तालुक्यातील कोपर येथील अर्पिता राजेश पाटील या विद्यार्थिनीला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.



हा धनादेश भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते अर्पिताकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वीय्य सहाय्यक हेमंत माने, तसेच अर्पिताचे वडील राजेश पाटील, आई सुजाता पाटील उपस्थित होते.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते.

अर्पिता पाटील ही खारघर येथील जी. डी. पोळ फाऊंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयात फिजिओथेरेपी या वैद्यकीय अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणार आहे, त्या अनुषंगाने तिला आर्थिक मदतीची गरज होती. तिच्या पालकांनी केलेल्या विनंतीनुसार तिला आर्थिक मदत करण्यात आली.

# सीकेटी विद्यालयात इन्वेस्टीचर समारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सीकेटी इंग्लिश मीडियम विद्यालयात इन्वेस्टीचर समारोह शिस्तबद्ध पद्धतीने साजरे करण्यात आला. गुरुवारी (दि. ११) सीकेटी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या इन्वेस्टीचर समारंभ अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यालयात असलेल्या ब्ल्यू, ग्रीन, रेड व यल्लो हाऊसचे कप्तान, उपकप्तान, मंत्री तसेच स्वयंसेवक यांना मान्यवरांच्या हस्ते बॅचेस व त्याचे वितरण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. या युगात अभ्यासाबरोबरच खेळालाही महत्त्व देणे गरजेचे आहे. ज्ञानदानाबरोबरच खेळालाही प्राधान्य मिळायला हवे. या हेतूनेच कार्यक्रमाचे आयोजिला होता.

विद्यार्थ्यांनी चांगल्या आरोग्यासाठी खेळाचा जीवनात समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे सकारात्मक वृत्तीबरोबरच नम्रता येते. खिलाडीवृत्तीमुळे पराभव पचविण्याची ताकद वाढीस लागते. खेळामुळे एकता आणि सहकार्याची भावना विकसित होते. कोणत्याही संकटाचा सामना करण्यात येतो, असे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले.

सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका प्राची इसे यांनी तसेच कार्यक्रमाचे आभार पूर्वा खेडेकर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयाचे प्रमुख संतोष चव्हाण विद्यालयाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी मॅडम, प्रायमरी विद्यालयाच्या प्रमुख नीलिमा शिंदे, वैशाली पारधी तसेच पालक संघ आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## रायगड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ५०१ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के तसेच शासकीय विभागांचे विभाग व कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

या वेळी पालकमंत्री सामंत म्हणाले की, रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेसा निधी उमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाने दिला आहे. गेल्या वर्षी ३६० कोटींचा असणारा आराखडा सन २०२४-२५साठी ४३२ कोटींचा केला असून या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या कल्याणसाठी प्रभावी योजना राबविण्यात येणार आहेत. सर्व यंत्रणांनी जिल्हा विकासासाठी लोकप्रतिनिधींनी दिलेले प्रस्ताव, सूचना व शिफारशीची तत्काळ अंमलबजावणी करावी.

विकासात्मक कामाला शासनाने अतिरिक्त ७२ कोटी निधी वाढवून दिला आहे. जिल्हा नियोजन समिती सभागृहाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. जिल्हा नियोजनमधून पोलीस यंत्रणेला वाहने, सीसीटीव्ही दिले आहेत. त्याचबरोबर पोलिसांची निवासस्थाने इमारत होत आहेत, असे सांगून पालकमंत्री सामंत पुढे म्हणाले की, ३०० खाटांचे नवीन जिल्हा रुग्णालय निर्माण करण्यासाठी १०५ कोटींचा निधी दिला आहे. जिल्हा आरोग्य यंत्रणा बळकट करण्यात येत आहे, परंतु संस्थात्मक प्रसुतीबाबत असलेली उदासीनता दूर करण्यासाठी सर्वांनी विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. यामध्ये हलगर्जीपण किंवा टाळाटाळ करणाऱ्यावर कारवाई करावी, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

मुख्यमंत्री वयश्री योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. या योजनेची ग्रामपंचायत स्तरावर तसेच पालिका स्तरावरही शिबिरे आयोजित करावीत. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचीही प्रभावी अंमलबजावणी करावी. न्हावा-शेवा टप्पा क्र. ३ पूर्ण करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर बैठक आयोजित करण्यात येईल, असे पालकमंत्री सामंत यांनी सांगितले. प्रशासकीय यंत्रणांनी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन जनहिताची कामे करावीत, असेही पालकमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

# 'सीकेटी'त चिमुकल्या वारकऱ्यांची दिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागात झाला विठूनामाचा गजर, छोट्या वारकऱ्यांनी लुटला वारीचा आनंद वारक-यांची वेशभूषा परिधान करून, तोंडी माऊलीचे नाव घेऊन, अभंग-कीर्तन गात, डोईवर तुळस ठेवून विठोबाचा गजर चिमुकल्यांनीही केला.



वातावरण विठ्ठलमय झाले होते. जणुकाही विठ्ठल नामाची शाळा भरली शाळा शिकताना तहान भूख हरली आपल्याला समतेचे आणि मानवतचे महत्त्व सांगणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या वारीचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने १६ जुलै रोजी पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त अभूतपूर्व सोहळा साजरा केला.

आषाढी एकादशी निमित्त अवघा महाराष्ट्र विठूमय होतो. वारकऱ्यांसोबत आपणही त्यात सहभागी व्हावे या हेतूने चिमुकल्यांनी आदल्या दिवशी ही दिंडी काढून शाळा परिसरात पंढरपूरच्या वारीची अनुभूती दिली. शिवाय आषाढी एकादशीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अभंग, कीर्तन, भारूड, गवळण हे कार्यक्रम अगदी उत्साहात झाले.

या कार्यक्रमा वेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्यासह सर्व शिक्षकवृंदही उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्येही कलागुणांच्या सहाय्याने आध्यात्माची गोडी लागावी म्हणून या वारीचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनीही विठूच्या गजरात ठेका धरत, फुगड्या घालत वारीची शोभा वाढवली. विठ्ठल-रुक्मिणीचा जोडा, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, तुकाराम आदींचे साक्षात दर्शन झाल्याने हा वारी सोहळ्याने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतले.

# उलवे शाळेत बालगोपाळांचा मेळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देवशयनी आषाढी एकादशी निमित्ताने रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील सीबीएससी माध्यमाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता.

पारंपरिक वारकरी वेशभूशेत विद्यार्थ्यांनी चल ग सखे पंढरीला हे गीत गाऊन उत्साहाचे वातावरण तयार केले. तिसरीमधील विद्यार्थ्यांनी संत गोरा कुंभार यांच्या आयुष्यावर नाटक आणि नृत्य सादर केले तसेच आषाढी एकादशी विषयावर भाषण सादर केले. यांनतर मोठ्या उत्साही वातावरणात दिंडी सोहळा झाला. यात शिक्षक विद्यार्थी यांनी सहभागी होत हरीनामाचा गजर केला. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी विठ्ठल नामाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना माहिती दिली.



# मिहीरला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

## वरळी हिट अॅण्ड रन प्रकरण

**मुंबई :** वरळी अपघात प्रकरणातील प्रमुख आरोपी मिहीर शाह याला पोलिसांनी मंगळवारी (दि. १६) पुन्हा एकदा न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने सर्व पुरावे तपासून, मिहीरने पोलिसांना दिलेला कबुलीजबाब वाचून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तो आता ३० जुलैपर्यंत कोठडीत राहील.

मिहीर शाह याने ७ जुलै रोजी (रविवारी) पहाटे वरळी परिसरात मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे बीएमडब्ल्यू (इचथ) कार चालवत एका दाम्पत्याला उडवले होते. यात कावेरी नाखवांना मिहीरने कारबरोबर फरपटत नेले. त्यांचा मृत्यू झाला.

# सुनीती जैन यांचे निधन



**मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार व महाराष्ट्र टाइम्सचे माजी कार्यकारी संपादक स्व. अशोक जैन यांच्या पत्नी सुनीती जैन (वय ७९) यांचे मंगळवारी (दि. १६) अंधेरी येथील कोकिळाबेन अंबानी रुग्णालयामध्ये निधन झाले. त्यांच्या पश्चात बिलवा व क्षिप्रा या मुली आहेत. सुनीती जैन यांनी डॉ. प्रदीप तळवळकर यांच्या 'डायबॅसिटी', 'मधुमेही खुशीत' ही पुस्तके अनुवादित केली असून, व्योमकेश बक्षी व फेलुदा यांच्या अनुवादात त्या सहभागी होत्या. त्या महाराष्ट्र सरकारच्या माहिती व जनसंपर्क विभागात अधिकारी होत्या. राष्ट्र सेवा दल, केशव गोरे स्मारक ट्रस्ट आदी संस्थांत त्या सक्रिय होत्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ३६०
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, १७ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'आषाढी' निमित्त शाळांमध्ये विठूनामाचा गजर/४
धामणदेवी हद्दीत दरड कोसळण्याची शक्यता/५
पेण चांदेपट्टी गाव पुन्हा भीतीच्या छायेखाली/७

## आषाढी एकादशीनिमित्त लाखो भाविक पंढरपुरात दाखल



**पंढरपूर** : आषाढी एकादशी सोहळा बुधवारी (दि. १७) आहे. यानिमित्ताने विठ्ठल-रूक्मिणीच्या दर्शनाची आस घेऊन पंढरपुरात राज्यभरातून पालख्या, वारकरी, भाविक दाखल झाले आहेत. दरम्यान, १५ लाखांपेक्षा अधिक भाविक दाखल झाल्याचा प्राथमिक अंदाज सोलापूर ग्रामीण पोलिसांनी वर्तविला आहे. पंढरपूर शहरातील सर्व मठ, लॉज, भक्तनिवास भाविकांनी फुल्ल झाले आहेत तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांवर भाविकांची गर्दी दिसून येत आहे. चंद्रभागा नदीपात्रात पवित्र स्नान करण्यासाठी मंगळवारी पहाटेपासून भाविकांनी गर्दी केली असून चंद्रभागा तीरावर भाविकांची सर्वात जास्त गर्दी पहावयास मिळत आहे. त्याचबरोबर विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची लागलेली रांग १० पत्राशेड पूर्ण करून गोपाळपूरपर्यंत पोहचली आहे. सर्वांना पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागल्याचे दिसून येते.


# वारकऱ्यांच्या बसला भीषण अपघात

## पाच जणांचा मृत्यू, ४६ भाविक जखमी

### ■ एक्स्प्रेस वेवर पनवेलजवळील घटना

**पनवेल, मोहोपाडा, खोपोली : वार्ताहर**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पनवेलजवळ मंगळवारी (दि. १६) मध्यरात्री पंढरपूरकडे निघालेली वारकऱ्यांची खासगी बस ट्रॅक्टरला धडकून भीषण अपघात झाला. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला असून ४६ भाविक जखमी झाले आहेत.



डोंबिवलीतील घेसर गावातून ५४ भाविक आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी जयश्री ट्रॅव्हल्सच्या खासगी बसने (एमएच ०२-एफजी ९९६६) पंढरपूरकडे जात होते. ही बस रात्री १च्या सुमारास मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पनवेल हद्दीत कोनजवळ आली असता चालकाचा ताबा सुटला आणि बस पुढे जाणाऱ्या ट्रॅक्टरला (एमएच ११-बीझेड २२८६) धडकली. त्यानंतर बस अनियंत्रित होऊन खड्ड्यात उलटली. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला.

मृतांमध्ये ट्रॅक्टरचालक तरवेज सलाउद्दीन अहमद (वय २८, रा. उत्तर प्रदेश) आणि अनोळखी व्यक्ती तसेच बसमधील गुरूनाथ बाबू पाटील (७०), रामदास नारायण मुकादम (७०) आणि हंसाबाई हरी पाटील यांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे ४६ भाविक जखमी झाले असून त्यांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी सात वारकरी गंभीर जखमी असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

**मृतांना पाच लाखांची मदत, जखमींवर मोफत उपचार**

अपघातातील जखमी वारकऱ्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात भेट देऊन विचारपूस केली. मृत व्यक्तींना शासनातर्फे पाच लाख रुपये मदत देण्याचे आणि जखमींवर शासनातर्फे मोफत उपचार करण्याचे मुख्यमंत्र्यांनी या वेळी जाहीर केले तसेच अपघाताची संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश दिले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून रुग्णालयात जखमींची विचारपूस



**पनवेल : भाविकांच्या अपघाताची माहिती मिळताच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात धाव घेऊन जखमींची विचारपूस केली तसेच डॉक्टरांसोबत चर्चा करून जखमींच्या औषधोपचाराबाबत माहिती घेतली.**

## पूजा खेडकरांचे जिल्हा प्रशिक्षण स्थगित

**पुणे** : प्रशिक्षणार्थी वादग्रस्त अधिकारी पूजा खेडकर यांचे जिल्हा प्रशिक्षण स्थगित करण्यात आले आहे. याबाबत राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गद्रे यांना मसुरीतील लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय अकादमीकडून सूचना करण्यात आली आहे, तर पुढील कारवाईसाठी कुठल्याही परिस्थितीत मसुरी येथे रिपोर्ट करा, असे आदेश खेडकर यांना देण्यात आले आहेत.



आयएएस खेडकरांचे प्रोबेशन काळात अनेक कारनामे समोर येऊ लागले. त्यामुळे त्यांना प्रशिक्षण थांबवून मसुरीला बोलावले आहे.

पाहिजेत
**सम्पर्क सल्लागार / अधिकारी**
आम्ही मुंबई मधील प्रसिद्ध विकासक आहोत आणि मुंबई व नवी मुंबई मध्ये मोठे प्रकल्प निर्माण करत आहोत
आम्हाला अश्या उमेदवाराची गरज आहे जे सिडको/ नैना/ महसुल विभाग या आस्थापना मधुन निवृत्त झाले आहे/ सल्लागार आणि जे आम्हाला नैना/ महसुल विभाग कडून मंजुरी मिळवन्यात सहकार्य करतील.
तरी पात्र उमेदवारानी आपला cv **hr@mapletreeproperty.com** या email वर पाठवा
**मॅपलेट्री प्रॉपर्टी प्रा. लि.**
तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४० ऑगस्ट क्रांती मार्ग,
शालिमार हॉटेल समोर, केम्प्स कॉर्नर, ग्रँट रोड (पश्चिम), मुंबई-४०००२६.
फोन: २३८३५५५५/ ७५०६५०५०३४

## रायगड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ५०१ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा नियोजन समिती बैठक मंगळवारी (दि. १६) पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली अलिबाग येथील नियोजन भवनमध्ये झाली. या वेळी जिल्ह्यासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२४-२५साठी ४३२ कोटी रुपये, अनुसूचित जाती योजनेंतर्गत २८ कोटी रुपये आणि आदिवासी उपयोजनेंतर्गत ४१ कोटी ६१ लाख अशा एकूण ५०१ कोटी ६१ लाख रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता देण्यात आली.

या बैठकीस खासदार सुनील तटकरे, सर्वश्री आमदार रविशेठ पाटील, प्रशांत ठाकूर, भरत गोगावले, महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, ज्ञानेश्वर घरत, **(पान २ वर..)**



## माथेरानच्या दरीत दाम्पत्याचे मृतदेह

**नेरळ** : माथेरानच्या लुईझा पॉईंट येथील दरीत रत्नागिरीमधील दाम्पत्याचे मृतदेह आढळून आले आहेत. पार्थ काशिनाथ भोगटे आणि लक्ष्मी पार्थ भोगटे (रा. राजापूर) अशी त्यांची नावे आहेत.

भोगटे दाम्पत्य चार दिवसांपूर्वी (दि. ११) माथेरानमध्ये फिरावयास आले होते. सायंकाळी ते बाहेर पडले, मात्र दुसऱ्या दिवशीही परतले नाही. याबाबत हॉटेलवाल्यांनी कळविल्यानंतर पोलिसांनी दाम्पत्याचा शोध सुरु केला. अखेर सोमवारी (दि. १५) लुईझा पॉइंटच्या सुमारे पाचशे फूट खोल दरीत भोगटे दाम्पत्याचे मृतदेह आढळले. सह्याद्री रेक्सू टीमच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आले. येथे यापूर्वीही घातपाताचे तसेच आत्महत्येचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे हा अपघात आहे की आणखी काही याचा पोलीस तपास करीत आहेत.















## संपादकीय

# अवघे गर्जे पंढरपूर

आज आषाढी एकादशी. टाळचिपळ्यांच्या नादाने भारावून पडणारी लाखो पावले एव्हाना पंढरपुरात पोहचली आहेत. मनामनांत ते एकच 'सावळे सुंदर रूप मनोहर' उमटलेले आहे. जे तिथे माथा टेकण्यासाठी पोहचू शकलेले नाहीत असे राज्यभरातले असंख्य भाविक गणही मनोमन 'तुझे रूप चित्ती राहो, मुखी तुझे नाम' म्हणत घरूनच मनाच्या चक्षूंनी विठुरायाचे दर्शन घेत आहेत.

**शेकडो वर्षांपासून महाराष्ट्राच्या या भूमीत आषाढी एकादशीचा दिवस म्हणजे विठुरायाच्या नामस्मरणाने भारावलेला दिवस. चंद्रभागेच्या काठी उभ्या ठाकलेल्या त्या परब्रह्माचे दर्शन घ्यायचे म्हणून लाखो पावले राज्यभरातून पंढरपुराच्या दिशेने चालत निघतात. ही वाट ऊन, वारा, पावसाची असते, पण वारकऱ्यांना ना वाटेतले अडथळे रोखत, ना मागे सोडलेल्या घरातील प्रापंचिक विवंचना. कितीएक वर्षांपासून महाराष्ट्राच्या भूमीत भक्तीयोगाची ही अनोखी वहिवाट सुरूच आहे. इथे जनसामान्यांना संसाररूपी महासागरातून तरून विठुरायाच्या चरणी पोहचल्याचा अपूर्व आनंद लाभतो म्हणूनच वर्षानुवर्षे लाखोंची पावले असंख्य दिंड्यांमधून ही वाट चालतच राहतात. इथला सगळा रिवाजच निराळा. संतांनी घालून दिलेली समतेची, सहिष्णुतेची शिकवण इथे खोलवर रुजलेली आहे. त्यामुळेच इथे जातिपातीच्या भिंती लोप पावतात. प्रत्येक भक्त दुसऱ्या भक्ताची गळाभेट घेतो, परस्परांमध्ये विठुरायाला पाहात हातही जोडतो. पंढरीनाथालाही ओढ असते ती भोळ्याभाबड्या भक्तांच्या भेटीचीच. त्यामुळे वारकरी इथे रिक्त हस्ते जातात, त्या सुकोमल सावळ्या पावलांवर डोके ठेवतात आणि धन्य होतात. आपल्या अवघ्या विवंचना त्याच्या चरणी वाहतात. विठोबा भक्तांच्या हाकेला धावून जाणारा आहे हे कितीएक अभंगांतून संतांनी सांगितलेले आहे आणि असंख्य वारकऱ्यांची आपल्या विठुरायाच्या कृपादृष्टीवर नितांत श्रद्धा आहे. म्हणूनच गावाकडच्या पीकपाण्याची चिंता काही दिवसांसाठी नजरेआड करून घराघरांतून कुणी ना कुणी पांडुरंगाच्या भेटीसाठी पायी वाट चालत इथवर येते. शेकडो वर्षांपासून सुरू असलेला भक्तीचा हा अनोखा सोहळा विनासायास पुढच्या पिढीलाही सामावून घेतो आहे. यात ना कुणाचे शिक्षण आड येत, ना पदप्रतिष्ठा. टाळचिपळ्यांच्या गजरात वारकऱ्यांसमवेत चार पावले चालून आपणही 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अनुभवावेत म्हणून असंख्य शहरी, सुशिक्षित, तरूण–प्रौढही वारीत सामील होतात. सगळे भेदाभेद बाजूला सारीत, परस्परांची काळजी वाहीत वारीची वाट चालण्याची तिथली रीत संकुचित अस्मितांच्या चौकटीत कोंदटलेले जिणे जगणाऱ्यांना भारावून टाकते. चार पावले वारीसोबत चालण्यासाठी गेलेली ही हौशी–गवशी मंडळी परतल्यावर प्रत्येकाला एकदा तरी हा आगळा अनुभव घ्यावा असे आवर्जून सांगतात. म्हणूनच वारीचा हा वारसा अखंड प्रवाहित आहे. नित्य नव्या निराळ्या रूपातील वारकऱ्यांना सामावून घेतो आहे. म्हणूनच ग्रामीण भागातील सदरा–लेंगा–गांधी टोपी, नऊवारी–सहावारी साडीबरोबरच इथे जीन्स–टीशर्टातील वारकरीही बह्मानंदी तल्लीन झालेले दिसतात. वारकऱ्यांची सेवा करण्याच्या भावनेने प्रेरित होऊन गेलेले सेवाभावी तरुण, वैद्यकीय व्यावसायिकही या गर्दीत सहज आढळून येतात. 'मी–तूपण गेले वाया। पाहता पंढरीच्या राया' हा अनुभवच अलौकिक. हे अद्वैत ज्याने खऱ्या अर्थाने अनुभवले, तो 'पळोनि गेले क्रोध काम' या वाटेला लागतो. आजच्या चंगळवादी जिण्यात उरापोटीची धावाधाव आपण कशासाठी करतो आहोत ही भांबावून टाकणारी भावना अनेकांना आयुष्याच्या कुठल्या ना कुठल्या टप्प्यावर थबकवत असते. मनातील सगळ्याच कोलाहलांना निववणारी शांतता त्या विठुरायाच्या दर्शनाने लाभते, म्हणूनच प्रतिवर्षी लाखोंची 'पाऊले चालती पंढरीची वाट...'**

# 'आषाढी'निमित्त शाळांमध्ये विठूनामाचा गजर

## गव्हाण विद्यालयात वृक्षदिंडी ▮ चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी व विठ्ठल रखुमाई यांच्या प्रतिमांची पालखी मिरवणूक काढून वृक्षसंवर्धनाचा जयघोष केला.

वृक्षदिंडी मार्गस्थ होण्यापूर्वी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी तथा समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांचेसह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर व अन्य मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात विविध प्रजातींच्या फळा फुलांच्या रोपांसह वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी इयत्ता दहावी ब ची विद्यार्थिनी प्राप्ती नाईक हिने वाढदिवसानिमित्त विद्यालयाला वृक्ष भेट दिली.

विद्यालयाच्या प्रांगणात अरुणशेठ भगत यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून वृक्षदिंडी मार्गस्थ झाली. तत्पूर्वी विद्यालयाच्या प्रांगणातून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन.घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांचीही वृक्षदिंडी मार्गस्थ झाली. ढोल ताशा, टाळ मृदंग व लेझीम पथकाच्या तालावर सर्व विद्यार्थी वृक्षदिंडीमध्ये अत्यंत उत्साहाने सहभागी झाले. विविध ठिकाणी वृक्षदिंडीचे व पालखीचे ग्रामस्थांनी विशेषतः महिला वर्गाने स्वागत करून भक्तीभावाने पालखीचे पूजन केले.

विद्यालयाच्या प्रांगणात रंगलेला रिंगण सोहळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला तर पालखी मिरवणूक मार्गावर विद्यार्थ्यी, शिक्षक तसेच महिला शिक्षिकांनी फेर धरून पारंपारिक फुगडी खेळत केलेला रिंगण सोहळाही लक्षवेधी ठरला.

या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर, मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, लेखनिक चंद्रकांत मढवी, प्रमोद करावकर, शितलकुमार म्हात्रे, राजेंद्र चौधरी, राजू खेडकर, माणिक घरत, अर्चना पाटील, जयवंती ठाकूर आदी ज्युनिअर कॉलेज व माध्यमिक विभाग तसेच दोन्ही शाखांचे सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी यांनी लेझिम पथकाचे नेतृत्व केले. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाप्रमुख हर्षला पाटील यांनी नियोजनबद्धपणे वृक्षदिंडीचे नेटके आणि आकर्षक आयोजन केले.

# रिटघर विद्यालयात विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे मंगळवारी (दि. १६) आषाढी एकादशी व वृक्षदिंडी कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. या वेळी श्री विठ्ठल रुक्मिणीची वेशभूषा विद्यार्थ्यांनी केली होती. इतर विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा (नववारी, सदरा पायजमा) केली होती.

पाचवी ते दहावी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांची वृक्षदिंडी रिटघर गावात काढण्यात आली. या दिंडीत वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणाऱ्या घोषणा देण्यात आल्या तसेच सर्व विद्यार्थ्यांनी रिटघर गावातील विठ्ठल रुक्मिनी मंदिरात भजन व आरती पेटी, तबल्यावर सादर केली. प्रल्हाद गुलाब भोपी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.

विद्यालयात विठ्ठल रुक्मिनीच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.बी साळुंखे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले. यानंतर सांस्कृतिक प्रमुख खुटले मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भजन व आरती केली.



**उरण : जेएनपीए विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वारी आणि वृक्षदिंडी काढली होती. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये 'आषाढी' सोहळा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणात दिसून आले. निमित्त होत आषाढी एकादशीच्या सोहळ्याचे विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती पूजनाने या सोहळ्यास प्रारंभ झाला. विद्यार्थी, विद्यार्थिनी वारकऱ्यांच्या वेशात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांनी विठ्ठलावर आधारित एक भक्तीगीत सादर केले, अत्यंत श्रवणीय गीता नंतर विद्यार्थ्यांनी रिंगण व टाळ वादन सादर केले. या नयनरम्य कार्यक्रमात लक्षवेधी ठरली ती पालखी. विद्यार्थ्यांनी पालखी काढून मिरवणुकीच्या माध्यमातून भक्तीरस अनुभवला.

या कार्यक्रमात सर्वच विद्यार्थी, विद्यार्थिनीनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासाबरोबरच संस्कृती व संस्कारांची रुजवणूक करण्याबाबत नेह्मीच अग्रेसर असणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले.

या वेळी सी. बी. एस. सी. विद्यालयाचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका अर्चना माथुर उपस्थित होते तसेच विद्यालयाच्या पर्यवेक्षिका कुसुम प्रजापती, सारिका लांजुडकर, नेहा खन्ना, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते.

# फडके विद्यालयात विठूरायाची पालखी

**पनवेल : प्रतिनिधी**

आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागात. मंगळवारी (दि.१६) आषाढी एकादशी विद्यालयाच्या सभागृहात साजरी करण्यात आली.

या वेळी मुख्याध्यापिका मनिषा महाजन यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पालखीपूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका, पालकप्रतिनिधी, सर्व शिक्षक शिक्षकेतर वर्ग तसेच आठवी ते दहावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. नववीतील तनिषा चव्हाण या विद्यार्थीनीने आषाढी एकादशीची माहिती सांगितली आणि संगीत शिक्षिका अंकिता थवई यांनी विठ्ठलाचा गजर सादर केला.

प्रत्येक सादरीकरणातून वृक्ष संवर्धन, मानवताहाच खरा धर्म, गरजूची मदत करा, ईश्वर भक्तीचे माहात्म्य, मातृ– पितृ सेवेचे महत्त्व असे विविध संदेश विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून व्यक्त होत होते. आषाढी एकादशीचे औचित्य साधून न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य असे संदेशसूचक घोषफलक घेऊन विद्यार्थी, विविध संतांची शिकवण देणाऱ्या घोषफलकांसह ध्वज व तुळशी घेऊन अभंग सादरीकरण टाळांच्या गजरात करत होते. जणूकाही पंढरपुरातच असल्याचा भास होत आहे असे मत पालकांनी उत्स्फूर्तपणे नोंदवून या उपक्रमाचे विशेष कौतुक केले आणि संस्थेचे व विद्यालयाचे आभार व्यक्त केले.



मुख्याध्यापिका मनिषा महाजन यांनी विद्यार्थ्या बरोबर शिक्षकांचेही कौतुक केले आणि संतांच्या शिकवणीचा अवलंब आपल्या जीवनात करण्याचे आवाहन केले. वैभवी मराळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# जासई विद्यालयात वृक्षदिंडी उत्साहात

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये आषाढी एकादशी निमित्त वारी, आणि वृक्षदिंडी मोठ्या उत्साहात करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या शुभहस्ते पालखीचे पूजन केले गेले. त्यांच्या समवेत विद्यालयाचे व्हाइस चेअरमन डी.आर. ठाकूर, यशवंत घरत, अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर आदी उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग त्याचबरोबर महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख यांनी पालखीला खांदा देऊन पालखीचे प्रयाण जासई गावात केले

विद्यालयातील सर्व विद्यार्थी पालखी समवेत ढोल ताशाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषाने पालखी फिरली. या पालखीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी वारकरी वेषात विठ्ठल रुक्माई पोशाख करून डोक्यावर तुळशी वृंदावन व विविध प्रकारच्या वृक्ष कुंड्या घेतल्या होत्या. गावातील सुवासिनिंनी वारीतील पालखीचे पूजन करून आशीर्वाद घेतले.



# विद्याभवनमध्ये स्वच्छता आणि आरोग्य दिंडी



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन शिक्षण संकुलातर्फे आषाढी एकादशी निमित्त स्वच्छता आणि आरोग्य संदेश देणाऱ्या दिंडीचे आयोजन करण्यात आले.

पूर्व प्राथमिक मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विभागाने आषाढी एकादशीचा उत्सव साजरा केला. पूर्व प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी विठ्ठलाच्या नामस्मरणावर नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी संतांच्या आकर्षक वेशभूषा केल्या. कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या हस्ते विठ्ठल रखुमाई पालखीचे औक्षण करून आरती करण्यात आली.

विठ्ठलाची पालखी दिंडी जवळच्या शिवनेरी सोसायटीच्या विठ्ठल रखुमाई मंदिरात नेण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता व आरोग्याचा संदेश देणाऱ्या घोषणा दिल्या. मंदिराचे पदाधिकारी यशवंत गोपाळे व चिखले मामा सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक या सोहळ्यास उपस्थित होते. सेक्टर १८ येथील शिवाजी चौकामध्ये विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी गोल रिंगण करून फुगड्या खेळल्या. विठू नामाचा गजर करून स्वच्छतेच्या व आरोग्याच्या घोषणा दिल्या.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयामध्ये वृक्षारोपण व वृक्षदिंडीचे आयोजन आषाढी एकादशी निमित्ताने करण्यात आले होते.

विद्यालयाचे सीबीएसई बोर्डचे स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर व धीरज वळेकर यांच्या हस्ते विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर निलेश खारकर, धीरज ओवळेकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर उपशिक्षिका विशाखा गावंड, पल्लवी पवार, वेदांगी म्हात्रे, भारती कोळी, आशा कस्पटे यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची पूजा करून पालखी मार्गस्थ करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पारंपारिक, वारकरी संप्रदायाची वेशभूषा करून ढोल ताशा व लेझीमच्या गजरात विविध रोपांच्या कुंड्या घेऊन पालखी उलवे नोड येथे फिरविण्यात आली.



या सोहळयासाठी उपस्थितांना निलेश खारकर यांच्या देणगीतून नाश्ता व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध झाली. तसेच निधी जितेंद्र सोमासे या विद्यार्थिनीचे पालक व उलवे गावचे दानशूर ग्रामस्थ जितेंद्र सोमासे यांच्याकडून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बॉटल्स वाटण्यात आल्या तसेच नववीच्या वर्गाच्या वर्ग शिक्षिका पल्लवी पवार यांनी वृक्षारोपणासाठी लागणारी रोपे उपलब्ध करून दिली.

वृक्षदिंडी चा कार्यक्रम नववीच्या वर्गाकडे सांस्कृतिक विभागा मार्फत सोपविण्यात आला होता. नववीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका पल्लवी पवार यांनी अतिशय उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी निलेश खारकर, धीरज ओवळेकर, पल्लवी पवार यांच्याबरोबर सर्व शिक्षक वृंदांचे अभिनंदन केले.

# धामणदेवी हद्दीत दरड कोसळण्याची शक्यता

## डोंगरातून येताहेत दगड व माती; वाहनचालकांमध्ये भीती



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील रस्ता हा वारंवार घडणारे अपघात आणि दरडी कोसळण्याच्या घटना यामुळे दिवसेंदिवस धोकादायक ठरत आहे. गेल्या वर्षी कापलेल्या डोंगरातून यंदा लाल मातीचे ढिगारे महामार्गावर कोसळू लागले आहेत.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण कशेडी घाटात करताना महामार्गाच्या तीव्र उतार आणि वळणांवरील डोंगर कापल्यामुळे धामणदेवी हद्दीत दरड कोसळण्याचा धोका आहे. यापूर्वीही या डोंगरातून दरड कोसळल्यानंतर धामणदेवी गावातील काही घरांच्या भिंतींना तडे गेल्याने ठेकेदार कंपनीकडून बाधितांना भरपाई दिली होती.

कशेडी घाटामध्ये धामणदेवी दत्तवाडी हद्दीत बोगद्याकडे जाणाऱ्या नवीन महामार्गाचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून याठिकाणीदेखील दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. याठिकाणी तळकोकणात आणि मुंबई दिशेने जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांवर दरड कोसळली तर एखादा मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे.

डोंगराचा भाग खाली आला तर हा भुयारांना जोडणारा मार्ग बंद होण्याची शक्यता दिसून येत आहे. याच ठिकाणी चार दिवसांपूर्वी मातीचा ढिगारा खाली घसरत आला होता.

भोगाव हद्दीत हायड्रोजन सिलींडरची वाहतूक करणारा ट्रक दरीत कोसळून अपघात झाला तेव्हा तसेच दरडी कोसळण्यावेळी चालक जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करीत असल्याचे दिसून आले आहे. यामध्ये आणखी दरडीचा धोका निर्माण झाला असल्याने धोक्याची टांगती तलवार दिसून येत आहे.

# 'आषाढी'निमित्त धाकटी पंढरी साजगावमध्ये भाविकांची मांदियाळी

**खोपोली : प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज व जगत्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीतील धाकटी पंढरीत आषाढी एकादशीनिमित्त बुधवारी (दि.१७) विठ्ठल-रखुमाईच्या दर्शानासाठी पहाटेपासून भाविकांची गर्दी होणार आहे.

बुधवारी ४.३० वा. विधीवत महापूजा व महाआरती झाल्यावर ५ वा.पासून भाविकांसाठी मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. दिवसभरात हजारो वारकरी विठुरायाचे दर्शन घेतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ज्यांना पंढरपूरला जाता आले नाही असे तालुक्यातील सर्व वारकरी व नागरिक आषाढी एकादशीला येथे दर्शनासाठी येतात.

साजगाव विठ्ठल मंदिर खालापूर तालुक्यातील वारकरी संप्रदायाचे माहेरघर आहे. मंदिराच्या व येथील संतांच्या माध्यमातून लाखो वारकरी संप्रदायाचे नागरिक व अनेक कीर्तनकार घडविले आहेत. आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी मंदिर व्यवस्थान कमिटीकडून सर्व नियोजन करण्यात आले आहे. खोपोली पोलिसांच्या माध्यमातून पोलीस बंदोबस्तही तैनात असणार आहे. खोपोली नगरपालिकेकडून खास सिटी बस असणार आहेत. एकादशीनिमित्त खोपोलीतून वारकरी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व विविध महिला बचत गटांच्या दिंड्या साजगाव येथील धाकट्या पंढरीला विठ्ठल चरणी येण्याची परंपरा असून, याही वर्षी ही परंपरा अबाधित राहणार आहे.



# वडवळ शाळेत अवतरली पंढरी; लहानगे विठ्ठल-रखुमाईच्या रूपात



**चौक : प्रतिनिधी**

पंढरपूर आषाढ एकादशीनिमित्त प्राथमिक शाळा वडवळ येथे दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे गावात आषाढी एकादशी वारीचे वातावरण निर्माण झाले होते.

बुधवारी पंढरपूरची आषाढ वारी एकादशी आहे. त्यानिमित्त शिक्षक व शाळा समितीने गावात दिंडीचे आयोजन केले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाईची वेशभूषा केली होती, तर अन्य विद्यार्थी वारकऱ्यांच्या वेशभूषेत होते. टाळ-मृदंगाच्या साथीने संपूर्ण गावात 'पांडुरंग पांडुरंग, विठू माऊली, जय जय रामकृष्ण हरी' या गजराबरोबर अभंग म्हणत दिंडीने सर्व गावात प्रदक्षणा घातली.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र कदम, सरपंच ज्ञानेश्वर सुतार, ग्रामस्थ मंडळ, शिक्षकवृंद यांच्यासह मुख्याध्यापक सुधाकर थळे, शिक्षक राजाराम जाधव, करूया बोंबे, हर्षा काळे, डि. डि. मरागजे, तंटामुक्ती अध्यक्ष देवजी मरागजे उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना मुख्याध्यापक सुधाकर थळे यांची आहे.

# चिंचोटी डोंगरातील धोकादायक दगड वनखात्याने हटविला

**रेवदंडा : प्रतिनिधी**



चिंचोटी डोंगरातील धोकादायक भला मोठा दगड वनखात्याने हटविल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला. पायथ्याशी असलेल्या घरांवर हा दगड पडण्याची शक्यता होती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते.

चिंचोटी वनविभागाच्या अखत्यारीत डोंगरभागात असलेला भला मोठा दगड जोरदार पावसाच्या तडाख्यात पायथ्याशी असलेल्या घरांवर पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. याचे गांभीर्य लक्षात घेऊन अलिबाग वनक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील यांनी कर्मचारी व ग्रामस्थांच्या सहकार्याने हा दगड दोरखंड बांधून डोंगराचे पायथ्याशी आणला. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली. या वेळी उमटा वनपाल मोकल, वनरक्षक एम. डी. तायडे, वनपाल घरत, दिनेश मौळे, खेडेकर, दत्ता कोळेकर, पाठारे, जाधव, पंकज घाडी, धुमाळ व इतर वनरक्षक अधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# निगडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतले शेतीचे धडे

**म्हसळा : प्रतिनिधी**





तालुक्यातील निगडी प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी संतोष भुवड यांच्या शेतात जाऊन भातलावणीचे तंत्र अवगत केले. भातलावणी करीत असताना नांगरणी कशी करावी याचा अनुभव व तंत्र माजी गाव अध्यक्ष गणूजी बारे यांनी सांगितले.

भाताची काढणीलायक रोपे उपटून त्याची मुठ बांधणे, बांधलेल्या रोपांची वाहतूक करणे, तसेच प्रत्यक्ष भातलावणीचे धडे रुचिता बारे, स्नेहा भुवड, गनिषा पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिले. विद्यार्थ्यांनी आनंदाने या उपक्रमात सहभाग घेतला. उपक्रमशील शिक्षक रमेश जाधव आणि उपशिक्षक भीम यादव यांनीही भातलावणीचा अनुभव घेतला.

निगडी प्राथमिक शाळेतील पहिली ते सातवीच्या ४४ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग घेतला. उपक्रमाबद्दल माजी सरपंच महादेव पाटील, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष मिलिंद मोरे, विद्यमान सरपंच वेदिका पाखड, उपसरपंच जयवंत मोरे, निगडी गाव अध्यक्ष रमेश काप यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक केले.

# आषाढी एकादशीनिमित्त मुरुडमध्ये निघाली दिंडी





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदिर विद्यालयाच्या चिमुकल्यांनी आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक वेशभुषा करून सावळ्या विठुरायाचा गजर करीत दिंडी काढली.

डोक्यावर तुलशी वृंदावन हातात भगवे झेंडे घेत टाळ-मुदुंगाचा गजर, ज्ञानोबा-तुकाराम अन् हरिनामाचा जयघोष करीत मुरूड मारुती नका, बाजारपेठेतून शाळेच्या पटांगणापर्यंत काढण्यात आली.

दरवर्षी आषाढी एकदशीला शाळेतील चिमुकले विद्यार्थी वेशभूषा करून दिंडी काढण्यात येते. या दिंडीतून मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखाच असतो, असे शिक्षकांनी सांगितले.

# कापडे बुद्रुक येथे हळद लागवड

## शेतकरी रामदास सकपाळ यांचा अभिनव प्रयोग

**पोलादपूर : प्रतिनिधी**



तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील उद्योजक व प्रगतशील शेतकरी रामदास सीताराम सकपाळ यांनी आपल्या शेतातील अर्धा एकर जमिनीमध्ये हळदीच्या सेलम जातीचा लागवड केली आहे. यापूर्वी रामदास सकपाळ यांनी सागाच्या शेकडो रोपांची लागवड करून तालुक्यातील शेतकऱ्यांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

रामदास सकपाळ यांनी हळद लागवडीसाठी सातारा जिल्ह्यातील वाई येथून ६०० किलो बियाणे खरेदी केले व त्यांच्या वाडीतील काही शेतकऱ्यांना त्यांनी प्रायोगिक तत्त्वावर बियाणे वाटप केले व त्यांना हळद लागवडीविषयी माहिती दिली. हळदीमध्ये तणाचे नियंत्रण करण्यासाठी गोल या तणनाशकाचा वापर करून तणाचा बंदोबस्त केल्याचे या वेळी रामदास सकपाळ यांनी सांगितले. त्यांनी पुढील वर्षी हळद लागवडीखालील क्षेत्र वाढविण्याचा मनोदय असल्याचे सांगितले.

या वेळी कृषी सहाय्यक कोमल कचरे यांनी, कापडे बुद्रुक गावामध्ये हळद पावडर तयार करण्यासंदर्भात प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग या योजनेमधून लाभ घेण्याविषयी मार्गदर्शन केले.

या वर्षी सोयाबीन पिकाची लागवड प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आली असून या पिकाचे खत व्यवस्थापन व तण नियंत्रण यासंदर्भातही कृषी सहाय्यक कचरे यांनी माहिती दिली.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ (बांधकाम), कोकण भवन, नवी मुंबई.**

**ई-मेल - rid2dnkb@gmail.com दूरध्वनी क्रमांक (०२२)-२७५७६४३७**

**ई निविदा सूचना क्र. ०७ सन २०२३-२४ (दुसऱ्यांदा)**

महाराष्ट्र राज्य मा. राज्यपाल यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र.-२ ( बांधकाम), कोकण भवन, नवी मुंबई, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून यांचेकडून खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ (http://mahatenders.gov.in) येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र.-२ (बांधकाम), कोकण भवन, नवी मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| | **कामाचे नाव** | **वांद्रे ल. पा. योजना, ता. मुरुड जि. रायगड या प्रकल्पाचे विंधन विवरे व माती परिक्षणाचे काम.** |
| | जिल्हा | रायगड जिल्हा |
| | निविदेची अंदाजित किंमत रूपये | रू.७५,६१,८२५/- |
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि.१८/०७/२०२४ ते दि.२९/०७/२०२४ |
| | ई-निविदा उघडणे | दि.३१/०७/२०२४ वेळ |
| | प्राथमिक अनामत रक्कम | रू.७५,६५०/- |

**टीप - निविदा सुचनेत दिलेल्या कालावधीमध्ये कोणत्याही तारखेला निविदा सूचना आणि बिड दस्तऐवजामध्ये पूर्णतः किंवा अंशतः बदल / सुधारित करण्याचा किंवा दुरुस्त करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.**

जा.क्र.रापावि क्र. २/लेखा-१/११८२ /२०२४.
कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र.-२ (बां),
कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालय
दि. ९/०७/२०२४.

**सही/-**
**(सं. द. जाधव)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग क्र.-२ (बां), कोकण भवन, नवी मुंबई**

**विमाका/कोवि/२०२४- २०२५/१७**

# कर्जतकर वैश्य समाज माहेरवशीणींचा स्नेहमेळावा

**कर्जत : प्रतिनिधी**



वैश्य समाजाच्या कर्जतच्या माहेरवशीणींनी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. काहींनी आपल्या लहानपणीच्या आठवणी, काहींनी कविता तर काहींनी गीते सादर करून धम्माल केली. विशेष म्हणजे धुवाधार पाऊस असूनही माहेरवशीणींची उपस्थिती लक्षणीय होती.

जयवंती फक्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून समारंभाचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी लीना भोपतराव, विद्या पोटे, प्रियांका जगे, प्रीती ठकेकर, स्मिता तांबोळी, आरती भोईर, अपूर्वा भोपतराव, शिवानी काळबेरे आदी उपस्थित होते. सुरुवातीला प्रत्येकीने आपली ओळख करून दिली. निकिता नारकर, प्रीती ठकेकर, राजेश्री चौधरी, पूनम रोकडे, दिव्या खड्कबाण आणि मीनल महाजन यांनी कविता सादर केल्या, मात्र अपूर्वा भोपतराव माहेरची कविता सादर करीत असताना उपस्थितांचे डोळे पाणावले. त्यांनी एक गीतही सादर केले. मानसी मनोरे यांनी भक्तीगीत सादर केले तर प्रियांका जगे आणि रेखा पेणकर यांनी नृत्य सादर करून सर्वांचीच मने जिंकली.

त्यांनतर उखाणे स्पर्धा, संगीत खुर्ची आदी पारंपरिक खेळ खेळून माहेरवशींणींनी दिवसभर धम्माल केली. अंतिम सत्रात लकी ड्रॉ काढण्यात आला. त्यामध्ये आरती भोईर आणि अपूर्व भोपतराव नशीबवान ठरल्या. त्यांना साड्या देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन शिवानी काळबेरे तर आभार प्रदर्शन अंकिता मनोरे व निकिता नारकर यांनी केले.

या वेळी सोनाली आहेर, नीलम खडकबाण, धनश्री साखरे, मनाली मनोरे, ऋतुजा गोरी, अक्षता पाटकर, वर्षा पांडव, सुगंधा पाटील, स्नेहा शेटचे, भारती भोपतराव, किशोरी बडेकर, भाग्यश्री पभोपतराव, मनीषा शेरेकर, स्वप्नाली चौधरी, अश्विनी गोरी, शिल्पा ठाकरे, सायली तेलवणे, रसिका पठारी, ज्योती गोरी, शुभांगी महाजन, पूनम नारशिंगे, सारिका माळी, शीतल शेटे, प्रियांका वाणी, मनीषा चौधरी, पूजा चौधरी, संगीता आंग्रे, सुवर्ण चौधरी, सूचित अस्वले, मेघा शेटे, नेहा रोठे, अश्विनी पोटे आदी रायगड, ठाणे, मुंबई, पालघर आदी जिल्ह्यांतून माहेरवशीणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. सोमवारी (दि.१५) एका दिवसात २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३१० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ७० हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## रानसई धरण ओसंडून वाहू लागले

# उरण तालुक्याची जलचिंता दूर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे उरणला पाणी पुरवठा करणारे रानसई धरण भरून वाहू लागले आहे. दुपारी ११.४५ वाजता हे धरण काठोकाठ भरले. त्यामुळे उरणकरांच्या पाण्याचा प्रश्न सुटला असून जलचिंता दूर झाली आहे. मागील वर्षी रानसई १८ जुलैला भरले होते. यावर्षी पाऊस उशिराने व धिम्या गतीने होऊन ही २०२३च्या तुलनेत तीन दिवस आधीच धरण भरून ओसंडून वाहू लागले असल्याची माहिती एमआयडीसी अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे पाणी कपातीचा सामना करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



रानसई धरणातून उरण मधील औद्योगिक कारखान्यासह, येथील २५ पेक्षा अधिक ग्रामपंचायती व उरण नगर परिषद यांना पाणी पुरवठा केला जात आहे, मात्र त्यासाठी लागणारा पाणीसाठा अपुरा पडू लागला आहे. त्यामुळे एमआयडीसीला सिडकोच्या हेटवणे धरणातून येणारे उसणे पाणी घ्यावे लागत आहे. तर नोव्हेंबर महिन्यातच आठवड्यातील दोन दिवसांची पाणी कपात करावी लागत आहे. उरण मधील पाणी पुरवठ्यासाठी दररोज ४० दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. तर धरणाची साठवणूक क्षमता ही १० दशलक्ष घन मीटर वरून ७ दशलक्ष घन मीटर वर आली आहे.

धरण क्षेत्रात आतापर्यंत ८८६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून सोमवारी दुपारी ११.४५ वाजता रानसईने ११६ फुटाची पातळी गाठल्याने धरण भरून वाहू लागल्याची माहिती पाचपुंड यांनी दिली.

**जुलै महिन्याच्या सुरुवातीपासुनच धरणक्षेत्रात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे पाण्याच्या पातळी सातत्याने वाढत चालली होती. मागील काही दिवसांपासून कोसळणारे आणि डोंगर माथ्यावरून येऊन थेट धरणात मिळणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे धरण दुथडी भरून वाहु लागले आहे. मागील वर्षीही १८ जुलै रोजीच धरण पूर्ण क्षमतेने भरले होते.**
**-विठ्ठल पाचपुंड, उपअभियंता, उरण एमआयडीसी**

# अक्षता म्हात्रेची हत्या करणाऱ्यांना फाशीची शिक्षा द्या -आमदार नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे गावातील सुकन्या अक्षता म्हात्रे या विवाहितेवर काही दिवसांपूर्वी अत्याचार करून तिचा अमानुष खून करण्यात आला. डायघर येथील मंदिरामध्ये घडलेल्या या घटनेने संपूर्ण नवी मुंबई हादरली आहे. या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी केली आहे.

लोकनेते आमदार गणेश नाईक, माजी खासदार डॉ. संजीव नाईक आणि नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी दिवंगत अक्षता हिचे आई-वडील आगासकर कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मंदिरासारख्या



पवित्र ठिकाणी मातेसमान एखाद्या महिलेवर अत्याचार करून तिची अमानुष हत्या करण्यात आली. याप्रकरणी जे दोषी आहेत. आणि जे या दुष्कृत्यात सहभागी आहेत. त्या सर्वांना फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे.

दिवंगत अक्षताला न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांबरोबर बोलून सरकारी वकील उज्वल निकम यांची याप्रकरणी नियुक्ती करण्याची विनंती आपण करणार असल्याची माहिती लोकनेते आमदार नाईक यांनी या वेळी दिली, असे अमानवीय कृत्य करणारे गुन्हेगार सुटणार नाहीत, याची दक्षता घेतली जाईल, असेही ते म्हणाले.

# माजी नगरसेविका सुशिला घरत यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका तथा प्रभाग समिती ड च्या माजी सभापती सुशिला घरत यांचा वाढदिवस दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून सोमवारी (दि. १५) साजरा झाला. वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला. त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच ज्येष्ठ नागरिकांना छत्रीचे वाटप करण्यात आले.



अस्मिता कला क्रीडा सांस्कृतिक मित्र मंडळ नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात सोमवारी करण्यात आले होते. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, के. डी.म्हात्रे, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, माजी नगराध्यक्षा स्मिता वाणी, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, अस्मिता कला क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळाच्या अध्यक्ष अस्मिता घरत, मनीषा चिले, सल्लागार परशुराम ठकेकर, कार्याध्यक्ष सचिन पाटील, उपाध्यक्ष नानचंद भोपी, सचिव शेखर करमकर, उपाध्यक्ष संदीप पाटील, खजिनदार राहुल मलोतकर आदी उपस्थित होते.



**खारघर : महाराष्ट्र ओरिया वेल्फेअर असोसिएशन व जगन्नाथ लोकतारण ट्रस्टतर्फे खारघरमध्ये जगन्नाथ रथयात्रा निघाली होती. या यात्रेची सांगता म्हणजे बहुदा यात्रा सोमवारी निघाली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. त्यांनी यात्रेत भगवान जगन्नाथ यांचे दर्शन घेऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या तसेच आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांना भेटी देऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. सोबत भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, अमर उपाध्याय, प्रवीण बेरा, आदित्य हातगे आदी उपस्थित होते.**

# युवकांनी कौशल्य प्रशिक्षणाची कास धरावी

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवकांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, रोजगारक्षम बनण्यासाठी कौशल्य प्रशिक्षणाची कास धरावी, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते.

लायन्स क्लब ऑफ पनवेल, यशस्वी ॲकडमी फॉर स्किल्स, पिल्ले ग्रुप ऑफ इन्स्टिटूशन व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट रायगड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल येथील पिल्लई इन्स्टिट्युटमध्ये जागतिक युवा कौशल्य दिन कार्यक्रम सोमवारी (दि. १५) उत्साहात साजरा झाला.

केंद्र सरकारने नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन तसेच अँप्रेन्टिस योजनेच्या माध्यमातून युवावर्गाला उपलब्ध करून दिलेल्या ऑन द जॉब ट्रेनिंगच्या सुविधेचा युवकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यायला हवा, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. या वेळी कौशल्य विकास प्रशिक्षणात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना आमदार प्रशांत ठाकूर व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.

सन्माननीय पाहुणे लायन्स क्लबचे प्रथम प्रांतपाल संजीव सूर्यवंशी आणि द्वितीय प्रांतपाल प्रवीण सरनाईक यांनी तसेच प्रसिद्ध प्रेरणादायी व्याख्याते व ज्येष्ठ मनुष्यबळ



व्यवस्थापनतज्ज्ञ जे.बी. काबरा आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स संस्थेचे संचालक राजेश नागरे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. काबरा व नागरे यांच्या हस्ते अँप्रेन्टिस योजनेतून ऑन द जॉब ट्रेनिंग यशस्वीरित्या पूर्ण करून विविध औद्योगिक कंपन्यांमध्ये कायमस्वरूपी नोकरीची संधी प्राप्त झालेल्या युवक युवतींना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष एस.जी. चव्हाण यांनी कौशल्य दिन साजरा करण्यामागचे महत्त्व सांगितले तसेच पाहुण्यांचे व मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमाला लायन्स क्लब ऑफ पनवेलचे रीजन चेअरपर्सन सुयोग पेंडसे, जीएलटी कोऑर्डिनेटर ज्योती देशमाने, नागेश देशमाने, हेमंत ठाकूर, खजिनदार मनोज म्हात्रे, प्रमोद गजहंस, अलका चव्हाण, शोभा गिल्डा, लायन्स क्लब ऑफ वाशीचे अनुभव जैन, डिस्ट्रिकचे जीएसटी कोऑर्डिनेटर विजय गणत्रा, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, यशस्वी ॲकडमी फॉर स्किल्सच्या कॉपोरेट कम्युनिकेशनचे योगेश रांगणेकर, पिल्लई कॉलेजचे डॉ. प्रशांत लोखंडे, निवेदिता मॅडम, प्रा. नितीनकुमार मोरे यांच्यासह पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लायन्स क्लबचे मिलिंद सूर्यवंशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अशोक गिल्डा यांनी मानले.

# रामशेठ ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे परीक्षांमध्ये यश

## मान्यवरांनी केले अभिनंदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील सौरभ कहादने हा इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे (आयसीएआय) मे महिन्यात घेण्यात आलेली सनदी लेखापाल (सीए) परीक्षा उत्तीर्ण झाला आहे तसेच व्यवसाय व व्यवस्थापन विभागातील आदित्य सिन्हा हा इंटरमिडीएट परीक्षा उत्तीर्ण झाला आहे.

या दोन्हीही विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असतानाही त्यांनी परिश्रमाच्या जोरावर अहोरात्र अभ्यास करून सीए परीक्षेमध्ये यश संपादन केले आहे. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे व प्रभाकर जोशी सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय यांनी या दोन्हीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनीही अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या दोन्हीही विद्यार्थ्यांना अकाउंट व फायनान्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा व व्यवसाय व व्यवस्थापन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रीत थुले यांचे मार्गदर्शन लाभले.

# वृद्धाला लुबाडले

**पनवेल :** एका ज्येष्ठ नागरिकाला बोलण्यात गुंतवून त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन कोणीतरी काढून घेईल, अशी बतावणी करून त्यांची फसवणूक केल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

लक्ष्मीकांत झा हे मोकळ्या मैदानात फिरत असताना एक अनोळखी व्यक्ती त्यांच्या जवळ आले व त्याने तुमच्या गळ्यातील सोन्याची चेन कोणीतरी काढून घेईल. त्यामुळे मी तुम्हाला काढून देतो असे बोलून त्या अनोळखी व्यक्तीने त्याच्या खिशातून शाळेतील वहिचा कागद काढला व त्यामध्ये सोन्याची चेन ठेवली. कागदामध्ये चेन ठेवली असल्याचे भासवून झा यांच्या उजव्या खिशात तो कागद ठेवून ते निघून गेले. थोड्या वेळाने कागद उघडला असता त्यामध्ये चेन आढळून न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दिली आहे.






# आषाढी एकादशीनिमित्त न्हावे विद्यालयात वृक्षदिंडी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडी तथा साक्षरता दिंडी काढली. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, चंद्रकांत भोईर, हरिश्चंद्र म्हात्रे, किसन पाटील उपस्थित होते. प्रस्तावित रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांनी केले. उपशिक्षिका कुसुम ठोंबरे व उपशिक्षक प्रसन्न ठाकूर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

विद्यार्थ्यांनी वृक्ष दिंडीच्या माध्यमातून ग्रामस्थांना वृक्षारोपणाचे, वृक्ष संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्याचप्रमाणे साक्षरता जनजागृतीही करण्यात आली.






निवडक

## डॉक्टरांकडून शिबिरात रक्तदान



**पाली** : रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानाचे महत्त्व लक्षात घेऊन रायगड मेडिकल असोसिएशन, रोहा तालुका मेडिकल चॅरिटेबल असोसिएशन, अलिबाग रक्तपेढी यांच्या सहकार्याने व माजी आरएमए सेक्रेटरी डॉ. पुरुषोत्तम भोईर यांच्या विशेष प्रयत्नाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. एकूण ४२ दात्यांनी रक्तदान केले. रायगड जिल्ह्यातील सर्व नामवंत डॉक्टरांनी रक्तदान शिबिरात सहभाग दर्शवून मानवतेचे दर्शन घडविले. या वेळी आरएमएचे सेक्रेटरी डॉ. चांदोरकर, उद्योगरत्न प्रसाद भोईर, डॉ. राजेंद्र धात्रक, डॉ. सुनील पाटील, डॉ. मिलींद धात्रक, डॉ. दिपक गोसावी, डॉ. कोकणे, डॉ. सोष्टे, डॉ. हाफीज, डॉ. पुरुषोत्तम भोईर, डॉ. प्रिया भोईर, डॉ. साधना झोलगे, डॉ. अश्विनी कुथे, अध्यक्ष डॉ. निशिगंधा आठवले, डॉ. रोहिदास शेळके उपस्थित होते.

## स्मशानभूमीची साफसफाई व वृक्षारोपण



**पाली** : पालीतील वरचा देऊळवाडा येथील ग्रामस्थ मंडळाने स्मशानभूमीची साफसफाई व परिसरात वृक्षारोपण केले. वृक्षारोपणाकरीता नगरसेविका मधुरा अमीर वरंडे यांनी नगरपंचायत पालीमार्फत ५० वृक्ष उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले. या वेळी राजाराम चव्हाण, आप्पा चव्हाण, विठोबा गायकवाड, विनायक राऊत, अमित वरंडे, अविनाश अशोक दंत, सुरेश गायकवाड, शुभम वरंडे, आर्यन जाधव, गौरव वाघमारे, संदेश वरंडे, सर्वेश राऊत, सूरज वरंडे यांनी मेहनत घेतली.

## गगनगिरी महाराज स्कूलला पुरस्कार


**खोपोली** : पुण्यातील प्रिन्सिपल कॉन्क्लेव्हमध्ये २०२४-२०२५ साठी प्रतिष्ठित आऊटस्टँडिंग इम्प्लिमेंटेशन ऑफ लाईफ स्किल्स प्रोग्राम पुरस्कार खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या प. पूज्य गगनगिरी महाराज इंग्लिश स्कूलला मिळाला. याबद्दल परिवाराचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. हे यश विद्यार्थ्यांना जीवनकौशल्यांसह सक्षम बनवण्याच्या आमच्या समर्पणाचा पुरावा आहे आणि आमच्या प्रयत्नांना मान्यता मिळाल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. आम्ही हे यश अभिमानाने आणि कृतज्ञतेने साजरे करीत असल्याचे मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, संचालक मंडळाचे यशवंत साबळे व इतर सदस्य, प्रिन्सिपल गौरव तिवारी यांनी भावना व्यक्त केल्या.




## खोपोलीत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**खोपोली** : आर्यन फ्रेंड्स फाऊंडेशनच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आयोजित केले होते. कनिष्ठ अनुवादक अधिकारी सीमाशुल्क विभाग सत्यवान यशवंत रेडकर यांचे मार्गदर्शन मिळाले. या वेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष जगदीश मरागजे, महेंद्र सावंत, सुधीर मुसळे, प्रमोद सावंत, प्रवीण सावंत, मंगेश सावंत, सागर मोरे, उपक्रम प्रमुख सचिन जाधव, अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, वडवळचे सरपंच ज्ञानेश्वर सुतार, उपसरपंच श्यामकांत सावंत, तसेच ग्रा.पं. सदस्य संजय कदम, जगदीश मरागजे, ग्रामसेवक प्रमोद पाटील उपस्थित होते.

# पेण चांदेपट्टी गाव पुन्हा भीतीच्या छायेखाली







**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील चांदेपट्टी गावात गेली अनेक वर्षे दरड कोसळण्याच्या व जमिनीला तडे जाण्याच्या घटना घडत आहे. त्यामुळे दरड व भूस्खलनाचा धोका असल्याने संपूर्ण गाव भीतीच्या छायेखाली वावरत आहे.

तालुक्यात गेल्या आठवड्यापासून संततधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे शनिवारी सकाळी गावात माती व दगड घसरल्याने ग्रामस्थांनी त्वरित तहसीलदारांना संपर्क केला. त्यांनी पाहणी करून ग्रामस्थांना गावातील सुरक्षित घरात स्थलांतरित केले आहे, परंतु गावाची यंदादेखील तीच परिस्थिती असल्याने संपूर्ण गाव भीतीच्या छायेखाली राहत आहे. या गावालगत

### दरड व भूस्खलनाची शक्यता

मोठ्या प्रमाणात बॉक्साईट उत्खनन केले जाते. त्यामुळे गावाला मोठा धोका निर्माण झाला आहे. केव्हाही हा गाव जमीनदोस्त होऊ शकतो, परंतु प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनदेखील याकडे कानाडोळा केला जात आहे.

पावसाळा सुरू झाला की, या गावातील नागरिकांना तात्पुरते स्थलांतरित केले जाते. स्थलांतरित केल्यानंतर शेती, गुरे, कोंबड्या, बकऱ्या तिथेच सोडून आल्यानंतर गावकऱ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे कायमचे स्थलांतर असेल तर ठिक अन्यथा तात्पुरती स्थलांतरासाठी आम्ही आमची शेती सोडून खाली येणार नाही, असे गावकऱ्यांनी ठरविले आहे. जर आमचे काही बरे वाईट झाले तर याला संपूर्ण प्रशासन अधिकारी जबाबदार असतील असे ग्रामस्थांनी सांगितले आहे.

आम्ही प्रत्यक्ष चांदेपट्टी गावाची आणि तेथील परिस्थितीची पाहणी केली. थोडी माती, दगड घसरल्याने तेथील बाजूच्या घरातील नागरिकांना तात्पुरते गावातील सुरक्षित असलेल्या घरात ठेवण्यात आले आहे. शक्य असल्यास योग्य ती खबरदारी प्रशासनाकडून घेतली जाईल, अशी माहिती तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी दिली.

## विठ्ठलनामाच्या गजरात चिमुकल्यांची दिंडी निघाली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना लहान वयातच महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाची ओळख व्हावी, या हेतूने चोरढे शाळेच्या शिक्षकांसह शाळा व्यवस्थापन समितीने आषाढी एकादशीनिमित्त गावातून दिंडी काढली होती.



मुरूड तालुक्यातील राजिप चोरढे शाळेत दहीहंडी, ग्रामस्वच्छता, रक्षाबंधन, वृक्षारोपण असे विविध उपक्रम शाळा राबविण्यात येतात. २०२३-२०२४च्या मुख्यमंत्री माझी शाळा, आदर्श शाळा या स्पर्धेत शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल, विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण चोरढे गाव दुमदुमला. विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून गावच्या सरपंच तृप्ती घाग, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश तांबडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थिती होते. गावातील भजनी मंडळ, ग्रामस्थ, पालक, वारकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

या वेळी शोभा पंची व केसरीनाथ आंबलीकर यांनी विद्यार्थ्यांसाठी खाऊ व टोप्या दिल्या, तसेच देवांश चोरढेकर यांनी पालखीची सजावट केली. शाळेपासून दिंडीला सुरुवात झाली. ढोलकी व टाळांच्या गजरात संपूर्ण गावात फिरून आल्यावर चोरढे एसटी थांबा येथे दिंडीची सांगता करण्यात आली.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका संगीता भगत, विजय जाधव, रमेश सुभेदार, राजेंद्र नाईक, प्रतिभा वर्तक, जयश्री पंची यांनी योग्य नियोजन केले. गट शिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

## राजिपकडून लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची शासनाच्या मार्गदर्शक सूचना व निर्देशानुसार रायगड जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेमध्ये सध्या ऑफलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त झालेले आहेत, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार योजनेच्या अनुषंगाने गाव पातळीवर समित्या गठित करण्यात आल्या असून प्रत्येक गाव, वॉर्ड स्तरावर बैठका घेऊन नियोजन करण्यात आलेले आहे. सर्व अंगणवाडीसेविका व पर्यवेक्षिकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मोहीम स्वरूपात



योजनेच्या अंमलबजावणीसाठी कॅम्पचे आयोजन करण्याबाबत सरपंच, नगरसेवकांना आवाहन करण्यात आलेले आहे.

गावातील अथवा त्या त्या वार्डमधील सर्व पात्र लाभार्थ्यांचे ऑफलाइन पद्धतीने हार्ड कॉपी अर्ज अंगणवाडीसेविकांकडे जमा करण्यात येत आहेत. अर्जाची नोंद अंगणवाडी स्तरावर घेण्यात येत असून त्याबाबतच्या नोंदी नोंदवहीत ठेवण्यात येत आहेत. प्रत्येक शनिवारी सर्व नोंद झालेल्या लाभार्थ्यांच्या नावांचे चावडी वाचन करून आक्षेप असल्यास पात्र, अपात्रतेबाबत गावपातळीवरच खातरजमा करून तालुकास्तरावर समितीने अंतिम मान्यता देण्यात बाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

गावातील प्राप्त झालेल्या सर्व ऑफलाईन अर्जाचे ऑनलाइन स्वरूपात अर्ज भरण्याकरिता गावातील ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, सीआरपी बचत गट तसेच सेतू सुविधा केंद्रातील डाटा ऑपरेटर यांच्यामध्ये वाटप करण्यात येवून ऑनलाईन फॉर्म भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

आतापर्यंत जिल्ह्यात ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने मिळून एक लाख ५५ हजार ९७ अर्ज प्राप्त झाले असल्याचेही डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले.

# पावसाचा जोर ओसरल्याने स्थलांतरीत कुटुंब परतली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पावसाने रविवारपर्यंत संततधार ठेऊन सोमवारी काहीशी उसंत मिळविल्यानंतर स्थलांतरीत कुटूंबांनी आपआपल्या घरांकडे प्रस्थान केले.



तालुक्यात सोमवारी सकाळी १५१ मिमी. पावसाची नोंद झाल्यानंतर दिवसभरात अधूनमधून जोरदार सरी कोसळल्या. यादरम्यान, रविवारी प्रशासनाने दरडीच्या छायेखालील तसेच नदीकिनारी असलेल्या कुटूंबांतील सदस्यांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी करण्यास सुरुवात केली होती.

तहसीलदार कपिल घोरपडे, पुरवठा अव्वल कारकून आबासाहेब जगताप तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी सहा गावांतील ६६ कुटूंबांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केले.

गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू असून सावित्री, कामठी, ढवळी, चोळई नद्यांना पूर आल्यानंतर नदीकिनारी तसेच दरडींच्या छायेत असलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला.

नाणेघोळ येथील १३ कुटुंब, कातळी गावातील १० कुटुंब, केवनाळे आंबेमाची येथील १२ कुटुंब, माटवण मोहल्ला येथील सात कुटुंब, सवाद येथील १० कुटुंब, साखर सुतारवाडी येथील नऊ कुटुंब असे एकूण १७३ जणांना रविवारी सुरक्षितस्थळी स्थलांतरीत केल्यानंतर सोमवारी पावसाचा जोर ओसरताच पुन्हा आपआपल्या घरी परतल्याची माहिती देण्यात आली आहे, मात्र दरड कोसळण्याची शक्यता आणि पूरस्थितीची शक्यता दिसून आल्यास या स्थलांतरीत लोकांना पुन्हा सुरक्षितस्थळी जाण्यास सांगण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## आषाढी एकादशीनिमित्त भाल येथे धार्मिक कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलवाडी भाल येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मंगळवारी (दि.१६) हभप नरेंद्र विठोबा म्हात्रे यांच्या विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ भाल यांचा हरिपाठ झाला. रात्री हभप प्राची मंदार व्यास डोंबिवली यांचे नारदीय कीर्तन झाले. त्यानंतर रात्री हरिजागर झाले.



बुधवारी पहाटे विठ्ठल रखुमाई मंडळ भाल-विठ्ठलवाडी यांची काकडा होईल. सकाळी ७:३० ते ९ या वेळेत गावात टाळ मृदुंगाच्या निनादात दिंडी फिरेल. सकाळी १० वा. हभप प्राची मंदार व्यास यांचे श्रीच्या पुष्पवृष्टीचे कीर्तन होईल. त्यांना तबला साथ जितेंद्र म्हात्रे, तर हार्मोनियमची साथ समाधान म्हात्रे यांची साथ लाभणार आहे. संध्याकाळी विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ भाल- विठ्ठलवाडी यांचा हरिपाठ होईल. त्यानंतर रात्री ९:३० वा. प्राची व्यास यांचे कीर्तन होऊन उत्सवाचा शेवट होणार आहे.

सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माणगावात करटोलीची आवक; गृहिणींची पसंती

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाल्यानंतर सर्वसामान्यांना रानभाज्यांचे वेध लागतात. गेल्या काही दिवसांत कोकणात संततधार पडणाऱ्या पावसामुळे रानावनात तयार होणाऱ्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात बाजारामध्ये विक्रीसाठी येत आहेत. पावसाच्या सुरुवातीलाच रानभाजी शेवळ तयार झाली असून नंतर रानावनातील झाडाझुडपात आढळणारे रानातील फळ भाजी म्हणजेच करटोली होय. तालुक्यात मोठ्या प्रमाणात करटोलीची भाजी विक्रीसाठी बाजारपेठेतून येत आहे.



खाण्यासाठी चविष्ट व रुचकर असलेली करटोलीची रानभाजी गृहिणींचीही मोठ्या प्रमाणात पसंती असते. तालुक्यातील आदिवासी महिलांना या रानभाज्या विक्रीतून चांगली कमाई होत असून गेल्या वर्षीच्या तुलनेत १० ते २० रुपये यावर्षी करटोलीची भाजी महाग झाली आहे. यावर्षी २०० रुपये किलोने करटोलीची भाजी विकली जात आहे.

महामार्गावरील बाजारपेठांची गावे व रस्त्याच्या कडेला आणि ठिकाणी करटोली विक्रीसाठी स्थानिक महिला व विक्रेते विक्री करत असून पर्यटक प्रवासी आवर्जून ही भाजी खरेदी करताना दिसत आहेत. पुढील काही दिवसच ही भाजी उपलब्ध होणार असल्याने खवय्ये करटोलीची भाजी आवडीने विकत घेत आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीला करटोलीची वेल उगवते. साधारणतः महिनाभरात करटोलीला फळे येतात. ही फळभाजी खाण्यासाठी अत्यंत रुचकर असल्याने ग्राहकांची चांगली मागणी आहे.

**झाडाझुडपात वाढत असणारी करटोलीची फळे मिळवणे कष्टाचे आहे. यातून चांगली आर्थिक कमाई होत असून रोजगार मिळत आहे.**

**-सोनी पवार,** भाजी विक्रेता

**पावसाळ्यातील रानभाज्या खाण्यासाठी अत्यंत चविष्ट व रुचकर असतात. करटोलीची भाजी तर आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी आहे. सुरुवातीला काही दिवसच ही भाजी मिळत असल्याने आवर्जून आम्हीही भाजी खरेदी करतो.**

**-कल्पना ठाकूर,** गृहिणी

## रस्त्याच्या कडेला खोदलेले गटार बनतेय धोकादायक

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या वतीने लाखो रुपये खर्च करून समुद्रकिनारा सुशोभीकरण केले जात आहे. याच कामापैकी असलेले काम म्हणजे गटाराचे काम. या कामाकरिता ठेकेदाराने रस्ता खोदला असून काम अर्धवट ठेवल्याने हे गटार पर्यटकांसाठी व वाहनचालकांसाठी धोकादायक बनत आहे.



मुरूड पर्यटनस्थळ असून याठिकाणी रोज शेकडो पर्यटक ये-जा करीत असतात. पावासाळ्यात समुद्रात जाण्यास बंदी असली तर समुद्रावर फेरफटका मारण्यासाठी पर्यटक, स्थानिक नागरिक येत असतात, परंतु या अर्धवट ठेवलेल्या गटार कमीत कमी चार फूट खोल असल्याने पकटीवर जाताना व उतरताना मोठी कसरत करावी लागत असल्याने नागरिकांनी नाराजी दर्शवली आहे.

सध्या शहरात जोरदार पाऊस पडत आहे. जर पावसाचे पाणी रस्त्यावर साचून राहिले तर वाहनचालक व पायी चालणाऱ्या नागरिकांना या गटाराचा अंदाज येणार नाही. यामुळे या ठिकाणी अपघात घडू शकतो. ठेकेदाराने येथे धोकादायक निशाणी लावावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# सीकेटी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त दिंडी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने पालखी सोहळा आणि वृक्षदिंडीचे आयोजन मंगळवारी (दि. १६) करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाईसह पारंपरिक वेशभूषा तसेच विठ्ठलनामाच्या केलेल्या गजरामुळे विद्यासंकुलात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

सर्वप्रथम संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांच्या हस्ते दिंडीच्या पालखीचे, पालखी-पूजन, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. एस.टी गडदे, विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक अजित सोनावणे, कैलास म्हात्रे, वैशाली पारधी, स्वाती पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी विद्यालयाच्या संगीत शिक्षिका अर्चना पाटील आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभंग सादर केले. मुलांनी गोल रिंगण घालून विठूनामाचा गजर केला. वृक्षारोपण कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व समजले. सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेत भक्तीरस अनुभवला.

















